## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २९ डिसेंबर २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००३/२०९३/प्र.क्र. ४६२/म-१.—ज्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई साठ) (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे, महाराष्ट्र शासन, अ व ब वर्गीकृत क्षेत्रातील सार्वजनिक/खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानामध्ये वित्त व्यवस्था संस्था किंवा वित्तीय कंपन्या यांसारख्या बिगर माहिती तंत्रज्ञान संस्थांनी माहिती तंत्रज्ञान युनिट आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा युनिट यांना नंतर अनुच्छेद ३६ आणि किंवा ३६(अ) अंतर्गत भाडेपट्टयाने देण्यासाठी निष्पादित केलेल्या अशा संलेखावर, उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची-१ मधील तारणगहाण, हडप, तारणविलेख [अनुच्छेद ६(२)], अभिहस्तांतरण पत्र (अनुच्छेद २५) अन्वये, खाजगी माहिती तंत्रज्ञान पार्कमधील जागा / क्षेत्र संपादित करण्यासाठी ७५ टक्के आणि सरकारी माहिती तंत्रज्ञान पार्कमधील जागा / क्षेत्र संपादित करण्यासाठी १०० टक्के, आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात याद्वारे, ४ जून २००३ रोजी प्रारंभ होणाऱ्या आणि ३० मे २००८ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता सूट देत आहे.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, भाडेपट्ट्याने देणाऱ्या व वित्त व्यवस्था संस्था / कंपन्या याचा अर्थ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, किंवा यथास्थिती, कंपन्यांचे निबंधक यांनी अशा प्रकारे प्रमाणित केले आहे अशा संस्था किंवा कंपन्या, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.